# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

करोना व्हायरसमुळे मिस्साला न जाऊ शकणाऱ्यांसाठी घरी करावयाची प्रार्थना

सोमवार २३ मार्च

## दूताचा मरियेला संदेश

प्रभूच्या दूताने मरियेला संदेश दिला

आणि ती पवित्र आत्म्याच्या योगाने गर्भवती झाली

नमो कृपापूर्ण मरिये ..... .

पहा मी प्रभूची दासी आहे

तुझ्या शब्दाप्रमाणे माझ्याठायी होवो

नमो कृपापूर्ण मरिये ..... .

आणि देवशब्द मनुष्य झाला

आणि आम्हामध्ये राहिला

नमो कृपापूर्ण मरिये ..... .

ख्रिस्ताने दिलेल्या वचनास आम्ही पात्र व्हावे म्हणून

हे पवित्र देवमाते, आम्हासाठी विनंती कर .

**आपण प्रार्थना करू या** ः हे प्रभो, तुझ्या पुत्राच्या देहधारणाचा संदेश दूताने आम्हाला दिला . त्याच्या दुःखसहनाच्या व क्रुसाच्याद्वारे आम्हाला पुनरूत्थानाचे वैभव मिळावे म्हणून आमची मने तुझ्या कृपेने संपन्न कर . ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो . आमेन .

गायन ः **प्रभात समयी** ....... . गीत क . १२ वसुंधरे गा

कुटुंब प्रमुख ः पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे

सर्व ः आमेन .

कुटुंब प्रमुख ः परमेश्वर आपले घर आणि हृदय विपुल शांतीने भरीत असतो . आपण त्याची आराधना करू या . परमेश्वर सदैव सुवंदित असो .

सर्व ः परमेश्वर सुवंदित असो .

## पश्चाताप विधी

कुटुंब प्रमुख ः प्रिय कुटुंबियांनो, या प्रार्थना विधीत सहभागी होण्यास आपण पात्र ठरावे म्हणून आपण आपल्या पापांची आठवण करू या व ईश्वराकडे विश्वासाने क्षमा मागू या.

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशू, तू आजा-यांना बरे केलेस.

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः प्रभू ख्रिस्ता, तू पाप्यांना क्षमा केलीस.

सर्व ः हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशू, आम्हाला शक्ती देण्यासाठी तू स्वतःला समर्पित केलेस.

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः सर्वसमर्थ परमेश्वर आम्हांवर दया करो व आमच्या पापांची क्षमा करून आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

सर्व ः आमेन.

**आपण प्रार्थना करू या** ः हे निर्माणकर्त्या प्रभो, तुझ्या संस्काराने तू आम्हाला नवजीवन देतोस. या नवजीवनात आम्हा सर्वांची वाढ होवो व तुझी कृपादृष्टी आम्हावर राहो. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

## प्रभूशब्दविधी

**पहिले वाचन ः यशया ६५ ः १७ - २१**

**वाचक** ः यशया ह्या पुस्तकामधून घेतलेले वाचन
प्रभू म्हणतो, पाहा, मी नवे आकाश व नवी पृथ्वी निर्माण करतो. पूर्वीच्या गोष्टी कोणी स्मरणार नाहीत, त्या कोणाच्या ध्यानात येणार नाहीत. परंतु जे मी उत्पन्न करतो त्याने तुम्ही सदा आनंदी व्हा व उल्हास पावा. पाहा, मी येरूशलेम उल्हासमय, त्याचे लोक आनंदमय करतो. मी यरूशलेमविषयी उल्हास पावेन; माझ्या लोकाविषयी आनंद पावेन. त्यात शोकाचा व आकांताचा शब्द पुनः ऐकू येणार नाही. यापुढे थोडे दिवस वाचणारे अर्भक त्यात जन्मास येणार नाही. जो पु-या आयुषाचा होणार नाही, असा म्हातारा त्यात असणार नाही. तेथील जो कोणी तरूणपणी मरेल तो शंभर वर्षाचा होऊन मरेल. देवाच्या शापाने मरणारा पापीही शंभर वर्षाचा होऊन मरेल. ते घरे बांधून त्यात राहतील. द्राक्षाचे मळे लावून त्याचे फळ खातील."

हा प्रभूचा शब्द आहे.

सर्व ः देवाला धन्यवाद.

प्रतिसाद स्तोत्र ः

प्रतिसाद ः **प्रभू, मी तुझा महिमा गातो.**

१. प्रभू, मी तुझा महिमा गातो, कारण तू मला वर आणले
आहेस; अशारितीने माझ्या शत्रूंना तू आनंद होऊ दिला
नाहीस. हे प्रभो, तू अधोलोकातून मला वर आणलेस
मी मर्तेत पडू नये म्हणून तू मला जिवंत ठेवलेस. . प्रतिसाद

२. अहो, प्रभूचे भक्त हो, त्याचे स्तवन करा,
त्याच्या पावित्र्याचे स्मरण करून धन्यवाद द्या.
त्याचा कोप केवळ क्षणभर, पण प्रसन्नता मात्र
आयुष्यभर. सायंकाळी दुःखाश्रू घर करतात
पण सकाळी आनंदाचा गजर होतो. . प्रतिसाद

३. प्रभूने माझे ऐकले व माझ्यावर दया केली.
प्रभू माझा साहाय्यकर्ता झाला. तू माझ्या
लोकांचे रूपांतर करून मला आनंदाने नाचायला
लावले आहेस. हे प्रभो, माझ्या देवा, मी सदैव
तुला धन्यवााद देईन.. प्रतिसाद

जयघोष

**गौरव व स्तुती प्रभू ख्रिस्ताला २**
'परमेश्वर म्हणतो, आता तरी मनःपूर्वक माझ्याकडे वळा
कारण मी कृपाळू व दयासागर आहे.'

**गौरव व स्तुती प्रभू ख्रिस्ताला**

शुभवर्तमान ः योहान ४ ः ४३ - ५४

वाचक ः योहानाच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन.

सर्व ः हे प्रभो, तुझा गौरव असो.

येशू शोमरोनहून गालिलात निघून गेला. कारण येशूने स्वतः साक्ष दिली की, संदेष्टयाला स्वदेशात मान मिळत नाही. म्हणून तो गालिलात आल्यावर गालिलकरांनी त्याचा स्वीकार केला; कारण येरूशलेममध्ये सणात त्याने जे काही केले ते सर्व त्यांनी पाहिले होते. कारण तेही सणाला गेले होते.

नंतर तो गालिलातील काना येथे पुन्हा आला. तेथे त्याने पाण्याचा द्राक्षरस केला होता. त्या स्थळी कोणीएक अंमलदार होता. त्याचा मुलगा कफर्णहूमात आजारी होता. येशू यहुदियातून गालिलात आला आहे हे ऐकून तो त्याच्याकडे गेला आणि त्याने त्याला विनंती केली की, आपण खाली येऊन माझ्या मुलाला बरे करा कारण तो मरणाच्या पंथास लागला होता. त्यावर येशू त्याला म्हणाला, "तुम्ही चिन्हे व अद्भूते पाहिल्यावाचून विश्वास ठेवणारच नाही." तो अंमलदार त्याला म्हणाला, "प्रभूजी, माझे मुल मरण्यापूर्वी तुम्ही खाली येण्याची कृपा करा." येशू त्याला म्हणाला, "जा, तुमचा मुलगा वाचला आहे." तो मनुष्य येशूने त्याला सांगितलेल्या वचनावर विश्वास ठेवून निघून गेला.

तो खाली जात असता त्याचे दास त्याला येऊन म्हणाले, "आपला मुलगा वाचला आहे". ह्यावरून त्याला कोणच्या ताशी उतार पडू लागला हे त्याने त्यांना विचारले. त्यांनी त्याला म्हटले, "काल सातव्या ताशी त्याचा ताप गेला." ह्यावरून ज्या ताशी येशूने त्यास सांगितले होते की, "तुमचा मुलगा वाचला आहे," त्याच ताशी हे झाले असे बापाने ओळखले आणि त्यानी स्वतः व त्याच्या सर्व घराण्याने विश्वास ठेवला. येशूने यहुदियातून गालिलात आल्यावर पुन्हा हे दुसरे चिन्ह केले.

प्रभूचे हे शुभवर्तमान

सर्व ः हे ख्रिस्ता, तुझी स्तुती असो.

**चिंतन** ः ते घर बांधून त्यात राहतील आणि द्राक्षाचे मळे बांधून त्याची फळे खातील. परमेश्वर जर घर बांधत नसेल तर बांधणा-याचे श्रम व्यर्थ आहेत. आणि परमेश्वर जर नगर रक्षित नसेल तर पहारेक-यांचे असणे व्यर्थ आहे. मळा लावल्यानंतर त्याचे फळ वेचण्याची अपेक्षा करणे रास्त असते. घर बांधल्यानंतर त्याच्याच राहायला जाणं क्रमप्राप्त असतं. परंतु यशया संदेष्टा सांगतो की ह्या गोष्टी आपण गृहीत धरू नयेत. घर बांधणारा त्या घरात वस्ती करीलच आणि मळा लावला आहे त्याला त्याची फळे वेचता येतीलच असे नाही. कर्ता करविता परमेश्वर आहे याचे भान आपण कधीही विसरू नये. मानवी जीवन हे मूलतः अपूर्ण आहे. आपले सर्व संकल्प आणि आपली सर्व स्वप्ने या जीवनात पुरी होत नाहीत. काही स्वप्ने अपुरीच राहतात. जीवन मर्यादीत आहे. मृत्यू हा जीवनाचा अखेरचा पूर्णविराम आहे. मृत्यूनंतर सर्व काही संपत नाही तर पुनरूत्थानाचा प्रवास सुरू होतो.

थोडावेळ शांत राहून आपण चिंतन करू या.

**आपण प्रार्थना करू या** ः हे प्रभो, जुने मार्ग सोडून देण्यास व नवीन मार्गाने मार्गक्रमण करण्यास आम्हाला कृपा दे व स्वर्गीय जीवनाच्या दिशेने वाटचाल करण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

**श्रध्दावंतांच्या प्रार्थना**

प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या लोकांना खऱ्या जीवनाच्या मार्गावर चालण्यास मार्गदर्शन कर.

१. आपला तारणारा येशू धन्य असो. त्याने आपल्या मरणाने आम्हासाठी तारणाचा मार्ग खुला केला आहे. म्हणून आपण प्रार्थना करू या. प्रतिसाद

२. हे दयाळू बापा, बाप्तिस्म्यामध्ये तू आम्हाला नवजीवन दिले आहेस. आम्ही तुझ्या प्रतिमेप्रमाणे वाढत रहावे म्हणून आम्हाला कृपा दे. प्रतिसाद

३. जे गरजू आहेत त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यास आम्हाला सहाय्य कर. त्यांना आम्ही जी मदत करतो तिच्याद्वारे आम्हाला तुझ्या अधिकाधिक जवळ ओढून घे. प्रतिसाद

४. जे चांगले व रास्त आहे ते करण्यास आम्हाला सहाय्य कर. संपूर्ण अंत:करणाने तुझा शोध घेण्यास आम्हाला सदैव तत्पर ठेव. प्रतिसाद

५. तुझ्या लोकांना दुखविल्याबद्दल आणि तुझ्या कुटुंबाचे ऐक्य टिकविण्यात अयशस्वी झाल्याबद्दल आम्हाला क्षमा कर. प्रभो आम्हावर दया कर. प्रतिसाद

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशूच्या शब्दांत आपण परमेश्वर पित्याकडे आत्मविश्वासाने प्रार्थना करू याः

सर्व ः आमच्या स्वर्गीय बापा । तुझे नाव पवित्र मानले जावो । तुझे राज्य येवो । जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही । तुझ्या इच्छेप्रमाणे होवो । आमची दररोजची भाकर । आज आम्हाला दे । जशी आम्ही । आमच्या अपराध करणाऱ्यांना क्षमा करतो । तशी तू आमच्या अपराधांची । क्षमा कर । आणि आम्हाला । मोहात पडू देऊ नकोस । पण वाईटापासून । आम्हाला सोडव. आमेन.

शांतीवंदना ः

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो, सर्व वाईटांपासून आमचे संरक्षण कर. या जीवनात तू आम्हाला शांती दे. आमच्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याची व शाश्वत जीवनाची आशेने वाट पहात असताना आम्ही तुझ्या दयेच्या साहाय्याने पापांपासून दूर राहावे व सर्व संकटापासून सुरक्षित असावे.

सर्व ः कारण राज्य, अधिकार व गौरव सदासर्वदा तुझाच आहे.

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो येशू ख्रिस्ता, तू आपल्या प्रेषितांस म्हणालास, "मी तुम्हांसाठी शांती राखून ठेवली आहे. मी माझी शांती तुम्हास देतो". म्हणून आमच्या पापांकडे पाहू नकोस तर तुझ्या ख्रिस्तसभेच्या श्रद्धेकडे पहा आणि आम्हाला तुझ्या स्वर्गीय राज्यातील शांती व ऐक्य देण्याची कृपा कर. तू नित्यजिवी असून सदासर्वदा राज्य करतोस.

सर्व ः आमेन

कुटुंब प्रमुख ः प्रभूची शांती आपल्या बरोबर सदा असो.

सर्व ः आणि तुम्हाबरोबर सुद्धा.

कुटुंब प्रमुख ः आपण एकमेकांस शांतीवंदन करू या.

**आपण प्रार्थना करू या** ः हे परमेश्वरा, आम्हाला नवजीवन व शुद्ध हृदय प्राप्त होवो व सार्वकालिक जीवनाच्या सुखाकडे आमची वाटचाल होवो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

**समारोपविधी**

कुटुंब प्रमुख ः प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्व कालिक जीवनाकडे नेवो.

सर्व ः आमेन.

कुटुंब प्रमुख ः आपण सर्व ख्रिस्ताच्या शांतीत जाऊ या.

सर्व ः देवाला धन्यवाद.

## करोना वायरसमुळे बाधित लोकांसाठी प्रार्थना

सर्वसमर्थ व दयावंत परमेश्वरा, सर्व जगाला तू तुझे प्रेम सदैव व सर्वत्र दाखवत असतोस.

करोना वायरसमुळे बाधित झालेल्या ह्या विश्वाच्या वेगवेगळया भागातील लोकांसाठी आम्ही करीत असलेली प्रार्थना दयेने ऐक.

करोना वायरसमुळे निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी ह्या आजाराने पछाडलेल्या व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्यदायी स्पर्श लाभण्यासाठी आम्ही तुझ्याकडे कळकळीने याचना करतो.

ह्या आजारावर लवकरात लवकर प्रभावी उपाय शोधण्यासाठी संशोधन करणाऱ्या डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश लाभावे म्हणून आम्ही तुझी करूणा भाकतो.

लोकांच्या हितासाठी झटणाऱ्या सरकारी व आरोग्य यंत्रणांद्वारे ह्या आजारावर मात करण्यासाठी योग्य पावले उचलली जात आहेत त्यांच्या फलद्रुपतेसाठी आम्ही प्रार्थना करतो.

ही प्रार्थना आम्ही प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

**गायन** ः कधी धरतीस ..... गीत क्रमांक ः वसुंधरे गा १६८